<u>**नियमीत दिवाणी दावा क्र.३२६/२०२० मधील निशाणी २४ वरील आदेश**</u>

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ चे कथन असे आहे की, सदरचा दावा वाटपाचा असल्याने कैफीयत दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ हा सतत अजारी असल्याने व प्रतिवादी क्र.२ हा शिक्षणानिमित्त बाहेरगावी राहत असल्याने वेळेत हजर होवून कैफीयत दाखल करता आली नाही. तरी त्यांना झालेला उशीर माफ करुन मिळावा.

३. वादीने निशाणी २४ चे अर्जाचे पाठीमागे आपलेले म्हणणे सादर केले. अर्ज मुदतीत नाही, मुखत्यारपत्र मान्य नाही, प्रतिवादीचा निष्काळजीपणा आहे. सबब अर्ज रदद करण्यात यावा.

४. प्रतिवादीच्या अर्जातील कथन व वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याच्या दृष्टीने व त्यांना बाजू मांडण्यासाठी संधी देणे आवश्यक वाटते. तसेच अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव दोन वर्ष झालेला उशीर माफ करणे योग्य व न्यायोचित वाटते व वादीसाठी खर्च मंजुर करणे योग्य वाटते. सबब, मी पुढील आदेश पारित करतो.

<u>**आदेश**</u>

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा निशाणी २४ चा उशीर माफीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादींनी वादीला खर्चापोटी रक्कम रु.१५००/- द्यावे व त्यानंतर कैफीयत अभिलेखार घेण्यात येते.

सही/-

**( दि. म. गिरी )**

दिनांक: ०२/०८/२०२३

६ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर, जि. अहमदनगर